# अक्षर वाङ्मय

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२
वर्ष : बारावे अंक : तिसरा



संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

**वर्ष : बारावे   अंक : तिसरा**

**जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२२**

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

कार्यकारी संपादक
**डॉ. शिवाजीराव देशमुख**

मार्गदर्शक
**डॉ. अरुण प्रभुणे**

संपादक मंडळ

**डॉ. बाळासाहेब लबडे**
**डॉ. रत्नाकर बेडगे**
समन्वयक
**रमेश देशपांडे, अमेरिका**

**डॉ. दीपक चिद्दरवार**
**डॉ. संदीप सांगळे**
समन्वयक
**सोनाली जांभेकर, अमेरिका**

---

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.

मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे–४११ ०३०

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/-
**द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/-
**अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

---

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रम


- संपादकीय ---------------------------------- ४
- मुखपृष्ठाविषयी ---------------------------------- ६
- वसंत दत्तात्रेय गुर्जर यांची कविता ---------------------- २४
  **सुधीर रसाळ**
- वचन साहित्य ---------------------------------- ६४
  **डॉ. जनार्दन वाघमारे**
- मुखवटे नृत्य : उगम व विकास ---------------------- ८८
  **डॉ. अंजली मस्करेन्हस**
- रत्नागिरी जिल्ह्यातील बौद्ध समाजाच्या अंत्यविधीची भाषा ------ ९६
  **डॉ. निधी पटवर्धन**
- 'वसुधा' द. भिं. चे पुण्यातील घर -------------------- १०५
  **डॉ. ऊर्मिला चाकूरकर**
- द.भि. : सहवासाचे जंतरमंतर ---------------------- ११६
  **डॉ. देवानंद सोनटक्के**
- 'कथाकार भास्कर चंदनशिव' : सर्जनाचा मूल्यगर्भ आविष्कार --- १२९
  **आसाराम लोमटे**
- 'ऑल दि वे होम' : एक वाचनीय विज्ञान कादंबरी ---------- १३७
  **सौ. उषा अरुण प्रभुणे**
- 'प्रोटोकॉल' : एक चांगला व समृद्ध कथासंग्रह ------------ १४४
  **दा. मा. बेंडे**
- 'अक्षर वाङ्मय' चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------ १५०
- संपादक मंडळ ---------------------------------- १५२

# द.भि : सहवासाचे जंतरमंतर

– डॉ. देवानंद सोनटक्के

वर्ष १९९६. त्यावेळी मी एम. ए. साठी नागपूर विद्यापीठ कॅम्पसमध्ये मराठी विभागात प्रवेश घेतला होता. विद्यापीठाच्या वसतिगृहात राहात होतो. कॅम्पस ते होस्टेल अंतर जवळ होते, तसेच जवळ होते अमरावती रोडवरील 'जंतरमंतर'. नावावरून अगदी गमतीशीर वाटणाऱ्या या इमारतीचे आम्हाला त्यावेळी खूप आकर्षण होते.

त्या इमारतील घराची रचनो इंग्रजी एक्स आकाराची होती. तळमजल्यावर ज्याचा हॉल होता त्यालाही वरच्या मजल्याची गॅलरी होती. त्यामुळे पूर्वेकडून खालच्या मजल्यावर राहणारा घरमालक पश्मिमेकडून गॅलरीत दिसत असे. त्याने खालच्या माणसाच्या अंगणात वरून कचरा टाकला की खालच्या माणसाची गॅलरी त्याच्यावर येत असल्यामुळे तो गॅलरीतून त्याच्या अंगणात कचरा टाकू शकत असे. अशाप्रकारे प्रत्येकजण तळमजला व वरच्या मजल्यावर राहू शकत असे. पायऱ्यांची रचना अशी की बेडरूममधून किचनला जायचे का, सहा पायऱ्या उतरा. किचनमधून हॉलमध्ये जायचे तर आठ पायऱ्या चढा, असे हे जंतरमंतर. त्यामुळे रविनगरकडून कॅम्पसकडे पायी जाताना या इमारतीची हमखास चर्चा होत असे आणि आणखी चर्चा व्हायची, ती इमारतीत राहणाऱ्या एका लेखकाची !

या लेखकाच्याही बाबतीत अशा कथा– दंतकथा आमच्या होस्टेलमध्ये प्रचलित होत्या. काय तर म्हणे, त्यांच्या कंपाऊंडच्याच दाराला घंटा लावल्या आहेत. कुणी आला तर डोअर बेल वाजविण्याआधीच घंट्याची किणकिण ऐकू येते. दाराजवळच 'सकाळ भेट वर्ज्य' अशी पाटी आहे. जवळील टपाल पेटीत दररोज न मावणारी पत्रे-मासिके येतात आणि हा लेखक संध्याकाळी एल. आय. टी. किंवा फुटाळा तलावावर दररोज फिरायला जातो. मुख्य म्हणजे



वय पासष्ट असले तरी सरांच्या सोबत तरुण असतात आणि ते अभ्यासाची चर्चा करतात.

– २ –

मी वणीवरून संपादित केलेला रंगस्वानंदचा दिवाळी अंक घेऊन, मी आणि मित्र संजय एक दिवस जंतरमंतरवर गेलो. घंटानाद करावा की करू नये या विवंचनेत, भीत भीत आत गेलो. अंक दिला. म्हटले, 'तुमच्या विद्यार्थिनीने तुमच्यावर लिहिलेला लेख यात आहे.' सरांनी सांगितले. 'बाळांनो, माझी मुलाखत एक पत्रकार घेत आहेत. ती संपेल तासाभरात, मग या.' मृदू आवाज. उंची मध्यम. वर्ण सावळा. कपाळावर झुलपे. ते केस मागे सारलेले. त्यामुळे रुंद कपाळ. चेहरा गंभीर. व्यक्तिमत्व प्रसन्न. तासाभराने भेट झाली. आमचा परिचय त्यांनीच करून घेतला. संवादही सहज झाला. त्या दिवशी आम्ही अखेर जंतरमंतर झालो.

एम. ए. दुसऱ्या वर्षाचे वर्ग जेमतेम सुरू झाले असावेत. माझा निकाल लागला होता. जेमतेम बी प्लस मिळाला होता. वर्गात मी हुशार होतो. मित्रांना वाटायचे मीच पहिला येईन; पण निकाल विपरीत होता. (त्याची कारणे त्यावेळच्या विभागाच्या सांस्कृतिक पर्यावरणात होती, हे नंतर कळले.) मी खूप उदास होतो. अबोल झालो होतो. एक दिवस एका वर्गमित्राने दभिंनी भेटायला बोलावल्याचा निरोप आणला. मी गेलो तेव्हा ते म्हणाले, 'माझ्या रायटरला नोकरी मिळाली आहे. म्हणून मला रायटर हवा आहे. तुम्हाला जमत असेल तर उद्यापासून या.' मी गप्पगार.

माझे अक्षर चांगले नव्हते, माझ्याजवळ सायकल नव्हती. या दोन्ही गोष्टी त्यांचा रायटर होण्यासाठी गरजेच्या होत्या. मी माझ्या अडचणी सांगितल्या. त्यांनी मान्य केल्या. पुढे तब्बल सहा वर्षे मी त्यांचा रायटर राहिलो. मला एका प्रश्नाचे उत्तर अजून कळले नाही की, दभिंनी मला रायटर म्हणून का निवडले? मी अंक प्रसिद्ध करत होतो म्हणून? अक्षर, शुद्धलेखन यापेक्षा वाङ्मयाची आवड हा त्यांच्या रायटरचा निकष मी पूर्ण केला होता? कसे?

– ३ –

सायंकाळी मी बरोबर तीन पंचावन्नला सरांकडे गेलो. जुन्या रायटरने- दीपक रंगारीने मला सगळे समजून सांगितले. पत्रव्यवहार. फाईल्स. वगैरे.

ऑफिसमध्ये सर्व व्यवस्थित ठेवलेले असायचे. कोरे कागद रायटिंग पॅडला नीट लावलेले. पेन भरपूर. लिफाफे, रेषांचे कागद, डिंक. सारे. सर चार वाजता अंघोळ करून स्वच्छ कपडे घालून यायचे. सहा वर्षात त्यांनी कधी मला वाट पाहायला लावले नाही. ते आतुरच असायचे. मनात विषय पक्का. मग खुर्चीवर ते. समोरच्या खुर्चीवर मी. मग डिक्टेशन सुरू. लहान मुलाला शुद्धलेखनासाठी धडा घालावा इतके हळू, शांतपणे सांगत. स्पष्ट उच्चार. शिवाय ह्रस्वदीर्घासहित शब्द सांगणार. मध्ये मध्ये संकल्पना, वाक्य, परिच्छेद काहीही शंका असेल तर विचारायची मुभा.

दभिंचे डिक्टेशन हे वाङ्मयीन एक प्रशिक्षणच होते. विचारांची पद्धत, विषयाचा प्रारंभ, विषय मांडण्याची, खुलवण्याची शैली. मध्येच नवा शब्द प्रचलित करण्याची हातोटी. प्रत्येक विषयाचे मुळापासूनच चिंतन, लहान लहान वाक्ये, लहान लहान परिच्छेद. पहिल्या वाक्यातील मुद्दा पटवूनच पुढचे वाक्य लिहिणे. दोन क्रियापदे सलगच्या दोन वाक्यात न वापरणे. मध्येच एखादा अपरिचित शब्द वापरणे. त्याच्या परिचित अर्थापेक्षा नवाच अर्थ म्हणजे- 'उपनिषद म्हणजे माहीत आहे ना? गुरूच्या पायाजवळ बसून ज्ञान घेणे' असे मध्येच सांगणे. वाचकाला बहुश्रुत करणे. सामान्य वाचकाला पटवून देणारी सोपी, पण सूत्रबद्ध वाक्यरचना. त्यामुळे समीक्षा लोकप्रिय करण्याचे श्रेय त्यांना आहे. शिवाय त्यामुळे त्यांचा कुठलाही लेख अपूर्ण विस्कळीत वाटत नाही. तो बौद्धिक असला तरी पढिक आणि पंडिती नसतो. खूप अवतरणे, संदर्भ ते देत नसत. मुळालाच ते हात घालीत. अनुभव व आस्वाद यांचा शोध घेत त्या प्रक्रियेत वाचकाला सामावून घेत. गरज असेल तर अवतरण द्यायचे. ते अवतरण त्यांनी ग्रंथात आधीच अधोरेखित केलेले असायचे. डिक्टेशन देताना वाक्य सांगून झाले की मग ते अवतरण मला पाहून लिहायला सांगत.

सायंकाळी सहा-सात पर्यंत लेखन झाले की मग फिरायला. फुटाळा नाही तर एलआयटी टेकडी. या वेळी मला माझ्या अभ्यासाबद्दल विचारावे लागे. एम. ए. चा एकेक घटक वा प्रश्न. त्यामुळे मला वाचूनच जावे लागायचे. उदा. ज्ञानेश्वरीतील रूपके. मग मला काय माहीत आहे, ते पूर्वज्ञान जाणूनच विषय सुरू करायचे. ज्ञानेश्वर कोण? ते कुठे होते? काय ग्रंथ लिहिले त्यांनी? वगैरे. अगदी मुळापासून. अलंकार म्हणजे काय, त्याचे स्वरूप, प्रकार लक्षणे,



मग ज्ञानदेवांचे आवडते अलंकार, मग भगवद्गीता, मग मराठी भाष्य, मग अध्याय, मग त्यातील विषय, मग समारोप, असे तपशीलवार. त्यामुळे पेशंट डोकेदुखीसाठी आला तरी पूर्ण चेकअप होऊनच बरा केला जाई. त्याचा मला फायदा असा झाला की सर्वांगीण अभ्यास घडत गेला. उद्या फिरायला गेल्यावर काय वाचले ते विचारणार. त्यामुळे गाईड वाचणे शक्यच नव्हते. पुस्तक मिळाले नाही, असे खोटे सांगता येत नव्हते. रात्री उशिरा परतलो तरी वाचावेच लागायचे.

शिवाय जे सांगितले ते दुसऱ्या दिवशी लिहून नेऊन दाखवायचे. रायटर असला तरी ही त्याची नोकरी नाही, तो ज्ञानार्थी आहे. विद्यार्थी, परीक्षार्थी आहे, ही खोल जाणीव सरांना होती. त्यामुळे त्यांनी त्यांची खाजगी कामे-दळण- भाजी वगैरे कधी सांगितले नाही. अलीकडे रायटर ही संकल्पनाच बाद होत आहे. एकल लेखनप्रथा संगणकामुळे शक्य आहे. दभिसरांची रायटर पद्धत म्हणजे जुन्या गुरुकुल पद्धतीचा सुधारित आविष्कारच. सान्निध्यातून अधिक ज्ञान. स्पाँडिलायटीसमुळे सरांना हात दुखून येई. म्हणून रायटर. त्या आजारामुळे मात्र त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांचे भले झाले. त्यांचे सगळे रायटर प्राध्यापक, संपादक व ज्ञानाच्या क्षेत्रातच आहे. एक वेळ पदवीधर बेकार असेल पण रायटरला लगेच नोकरी लागत असे. मी एम. ए. होण्याआधीच मला लोकसत्तातून ऑफर आली होती. तीही यामुळेच. असो. पुन्हा फिरून आलो की उरलेले डिक्टेशन. सोय दोघांचीही. खरे तर आम्ही रायटरनेच त्यांना ट्यूशन फी द्यायला हवी होती. इतके महत्त्वाचे ज्ञान ते देत. बेझलवार मॅडम म्हणायच्या, 'सरांजवळ राहतो. देवानंदचा हेवा वाटतो.'

सायंकाळी दभि इतरांना भेटत असत. अर्थात आधी फोन करून लोक वेळ घेत. मग त्या दिवशी डिक्टेशन नाही. मग चर्चा. कितीतरी वेगवेगळे विषय. वेगवेगळे लोक. हृदयनाथ व उषाताई मंगेशकर, कवी सुरेश भट. रवींद्र पिंगे, निर्मलकुमार फडकुले, कुमार सप्तर्षी, रामदास भटकळ, अनंत दीक्षित, अरुण जाखडे, उषाताई देशमुख, श्रीनिवास सिरास, वीणा आलासे, कुमार सप्तर्षी...कितीतरी मान्यवर यांना जवळून पाहण्याचा-भेटण्याचा मला लाभ झाला. हृदयनाथ मंगेशकर व सुरेश भट यांना माझ्या खांद्यावर हात ठेवून गाडीपर्यंत मी पोचवत असे तेव्हा त्या स्पर्शाचा कोण अभिमान वाटत असे.

साहित्य, सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान, संगीतकला, चित्रपट, लैंगिक शिक्षण. असे कितीतरी विषय या भेटीत चर्चेला येत. त्यातही दभिंचे लाडके विद्यार्थी- हेमंत खडके, पुरुषोत्तम माळोदे, तीर्थराज कापगते, श्याम धोंड, प्रमोद मुनघाटे इ. हे लोक इतके नवे विषय व वेगळे विचार मांडत की, ती सगळी चर्चा रेकॉर्ड करून ठेवावयास हवी होती, असे आता वाटते. कारण प्रत्येक विषयावर दभि अत्यंत भिन्न आणि मौलिक विचार मांडत.

चर्चेतील मौलिक विचार घेऊनच मी होस्टेलला परतत असे. अनेकदा रात्रीचे दहा वाजायचे. मेस बंद होत असे. जेवण थंड. दुसऱ्या दिवशी अकरा वाजता विभागात तास. दुपारी अडीचला ते संपले की फ्रेश होऊन दभिंकडे. वेळच कुठे? त्यामुळे मी रात्रीच किंवा पहाटे उठून मी व सरांनी काल चर्चिलेल्या प्रश्नाचे उत्तर पुस्तक पाहून लिहून काढत असे. पण त्यात चिंतन व सलगता नसायची. मग दभि दुसऱ्या दिवशी ती चूक लक्षात आणून द्यायचे. 'या मुद्द्यात तुम्ही एकदम उडी मारली आहे. विषय पटवत खुलत मांडला पाहिजे, एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याशी असा संबंध पाहिजे, की ते वाक्य आधीच्या वाक्याचे स्पष्टीकरण किंवा विस्तार वाटावा' वगैरे सांगत. मग पुन्हा घरी येऊन त्याचे पुनर्लेखन करायचे.

कधी डिक्टेशनला गेलो, ते आत असले तरी मला वाट पाहायला लावत नसत. म्हणत, 'तुमच्यासाठी काही सूचना आहेत, नोटपॅडवर. वाचा.' एकतर अहोजाहो म्हणत असल्याने गांभीर्य आणि सूचना म्हटल्याने दडपण. काल डिक्टेशन दिलेले त्यांनी पुन्हा वाचून दुरुस्त केलेल्या सूचना एका कागदावर क्रमाने असायच्या. 'अक्षरावर शिरोरेषा द्यावी. सुबक दिसते. वेलांटी पूर्ण काढावी. घ, आणि ध, ट आणि र, भ, आणि फ यातील भेदाच्या गाठी नीट काढाव्यात. आकडे अक्षरातच लिहावेत. दोन्ही बाजूंनी समास हवा. मन एकाग्र हवे.' वगैरे. शंभर ते दोनशे रुपये मानधन. त्यात इतक्या चुका. राग येऊ नये म्हणून सर्वांसमोर वा तोंडी न सांगता लेखी. यातून मला हे काम रेखीव, कोरीव बारकाईने आणि मुख्य म्हणजे मन एकाग्र करून लिहिणे- हे शिकता आले. एकदा एक फोन होता, प्रथेप्रमाणे तो 'आपण कोण' असे मृदू भाषेत विचारून मग सरांना द्यायचा. म्हणून मी विचारले, तर ते म्हणाले, 'हृदयनाथ मंगेशकर', मी एकदम उभाच राहिलो. मग त्यांनी पण विचारले. मी 'रायटर' सांगितल्यावर म्हणाले, 'म्हणजे आम्ही तुमच्या अक्षरातली पत्रे वाचतो होय!' लेखन नियमाबरोबर संभाषण नियम पण शिकवले. कसे बोलावे, शब्दांचे उच्चार कसे करावे, पत्ता कसा सांगावा... शिवाय वागण्याचे मॅनर्सही सांगणार- लिहिताना पेन कानात घालू नये, भडक कपडे वापरू नये, कपड्यांचे रंग असे असावेत. कारचा दरवाजा कसा लावावा. इत्यादी.



– ४ –

विद्यार्थी घडवण्याची त्यांची पद्धत अशी होती. त्याच्या जोडीने ते तो विषय वाचत. मग ते एम. फिल., पीएच. डी.चे प्रकरण असो की वृत्तपत्रीय लेख. ओळ अन् ओळ, शब्द अन् शब्द वाचून, खाणाखुणा करून, शंका विचारून, चर्चा करून ते पूर्ण करीत. ज्ञान कोणत्याही स्वरूपाचे, अल्पसे का असेना त्यांची तीव्रता आणि तळमळ मात्र सारखीच होती. ते तेवढाच जीव ओतत. पुन्हा त्याचे प्रकट वाचन. माझे प्रकट वाचन त्यांना आवडत असे. इतरांनी लिहून आणलेले लेख ते वाचू लागताच म्हणायचे, 'देवानंदला द्या. वाचेल तो.' त्यामुळे माझे वाचन उच्चार खूप सुधारले. दभि ऐकत आहेत म्हटल्यावर महाराष्ट्रातला कोणीही वाचताना काळजीच घेईल. शिवाय ते 'आजार' व 'अवजार', 'जरा' आणि 'जरा', 'जात' आणि 'प्राणिजात' अशा तऱ्हेच्या शब्दातील 'ज' चे उच्चार कसे करायचे म्हणजे ते अर्थविभेदक कसे ठरतात ते सांगत.

सरांशी होणाऱ्या चर्चा, वाद, त्यांच्याकडे येणाऱ्या वाङ्मयप्रेमींचे संभाषण- यांतून संवाद साधण्याची पद्धत, मुद्दा मांडण्याची पटवून देण्याची पद्धत कळत केली. माझी वाङ्मयीन समजही वाढत गेली. वाचन पद्धत, अभिरुची, विचारप्रक्रिया आणि शैली घडत गेली. एखाद्या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टीच ते बदलून टाकत. या काळातच दभिंचे व्यक्तिमत्त्व अधिक कळत गेले. दभिंचे वाङ्मयावर त्या खालोखाल विद्यार्थ्यांवर- तेही वाचन-लेखन करणाऱ्या - प्रचंड प्रेम. तेवढे कुटुंबीयांवरही नसेल. ज्ञानाबद्दल मुळातून ओढ. त्यामुळे सर्व विषयावरील ग्रंथ ते वाचत. अगदी मेंदूची रचना, खगोलशास्त्र, शिल्पशास्त्र इ. कुठलाही विषय. वाचताना खाणाखुणा, शंका मते व शेवटी निरीक्षणे नोंदवत. त्याखाली दभि अशी तिरपी सही. गरज पडली तर ती नोंद विषयानुसार

कार्डावर करीत. जसे प्राचीन इतिहास, अर्वाचीन काव्य. अशी शेकडो कार्डे त्यांच्या घरी होती. अनेकदा ती कार्डे ते चाळत, मग तो विषय त्यांच्या डोक्यात सुरू होई.

मी बरीच वर्ष त्यांच्या भाषणाचा विचार करीत होतो. इतरांशी त्यांची तुलना करून पाहत होतो. त्याकाळी राम शेवाळकर, निर्मलकुमार फडकुले, शिवाजीराव भोसले ही मंडळी वक्ते म्हणून प्रसिद्ध होती. पण ते मला शब्दनिष्ठ आणि बहिर्मुख वाटत. दभिंचे वक्तृत्व अंतर्मुख असायचे. आतल्या आत ते संवाद साधत आहेत. काही शोधत आहेत असे वाटायचे. मुख्य म्हणजे ते श्रोत्यालाही सामावून घेत प्रश्न उपस्थित करत त्याचे उत्तर जणू सर्वांनी शोधायचे आहे, अशी जाणीव निर्माण करत. त्यांचे व्याख्यान ही मौखिक समीक्षा तर असायचीच. पण लोकसाहित्यासारखा त्याचा आविष्कार ते सार्वत्रिक करत. लोकगीतात पहिला सूर एकीने आळवला तरी तो तिचा नसतो, ती साऱ्यांच्या मनातले गात असते.

ज्ञानेश्वर, मर्ढेकर आणि जीए हे त्यांचे अत्यंत आवडते लेखक. मराठी साहित्यात या प्रत्येकाने क्रांतिकारक परिवर्तन आणले. ही वाङ्मयीन परंपरा कायम राहावी म्हणून तिचे स्मरण, चर्चा, विकसन, उपयोजन होत राहावे म्हणून त्यांनीच स्थापन केलेल्या 'प्रास'- प्राध्यापक सभा-मार्फत ते दरवर्षी गुरुपौर्णिमा, मर्ढेकर आणि जीए स्मृतिदिन साजरा करीत. दरवेळी या प्रतिभावंतावर नवे भाष्य करीत. बाहेरचा वक्ता बोलावला तरी लोकांना दभि काय बोलतात, याचेच औत्सुक्य असायचे. त्यांच्या गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाची अनेकदा काही जण चेष्टाही करीत. पण सरांनी हे निष्ठेने केले. या तिघांनीही साहित्यामध्ये नव्या परंपरा निर्माण केल्या त्याचे अनुसरण किंवा खंडन व्हावे व विचार पुढे जावा ही त्यांची तळमळ होती. सूत्रसंचालन, आभार, प्रास्ताविक, कार्यक्रमपत्रिका नियोजन यांची जबाबदारी देऊन त्यांनी आम्हाला घडवले. संवाद, संपर्क, निमंत्रणपत्रिकेची कल्पकता, विषयाचे नावीन्य इत्यादी ज्ञान नकळत मिळाले.

– ५ –

एम. ए. चा निकाल लागला त्या आधीच्या रात्री मी सरांकडे असताना दै. 'सामना'मधून पत्रकाराचा फोन की एम. ए. चा निकाल लागला आहे



आणि तो उद्या छापून येणार आहे. सरांनी लगेच वृत्तपत्राला फोन लावला. निकाल मात्र कळू शकला नाही. ते म्हणाले, 'चला विद्यापीठात'. मी म्हटले, 'सर, निकाल उद्या पेपरमधून कळेलच आणि आता रात्रीचे आठ वाजत आहे'. ते म्हणाले, 'असू दे. विद्यापीठाचा गेटवर यादी लावतात. चला.' आम्ही गाडीतून विद्यापीठ गेटवर. तेथे निकाल वगैरे काही नव्हता. पण सरांची अधीरता होती. इतके आतुर त्यांना मी साहित्य संमेलनाच्या निकालाबद्दलही पाहिले नाही. त्यांनी 'सामना'च्या कार्यालयात गाडी नेली. निकाल प्रेसमध्ये गेला होता. परत आलो घरी.

अगदी सकाळी मी सरांकडे गेलो. दै. 'हितवाद'मध्ये सरांनी माझ्या नंबर अधोरेखित केला होता. मला फर्स्ट क्लास मिळाला होता. ते म्हणत होते, 'फर्स्ट क्लास मिळाला पाहिजे. मराठीत क्लास मिळणे आणि नापास होणे कठीण.' मी पाया पडलो. सरांनी हातावर पेढा ठेवला आणि शंभर रुपये दिले म्हणाले, 'पेढे द्या मित्रांना!'

एम. फिल. करायचे मी ठरवले. त्याच वेळी नागपूरच्या श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात तासिका तत्त्वावर प्राध्यापक हवा होता. सरांनी मला व डॉ. अरुणा देशमुख यांना अर्ज करायला सांगितले. मुलाखत होऊन मी रुजू झालो. पहिले अध्यापन. मी तरुण. कॉलेज मुलींचे. सर म्हणायचे, 'बॉस आणि विषमलिंगी व्यक्ती शेगडीसारख्या असतात. जवळ गेलं की चटका बसतो, दूर राहिलो तर ऊब मिळत नाही.' त्यांचे हे द्राष्टान्तिक कोणत्याही महानुभावाला मोलाचे होते.

मी शिकवायचो सकाळी आणि दुपारी एम. फिल.च्या वर्गात शिकायचो. प्रबंधासाठी मला नेमाडे किंवा चित्रे यांच्यावर संशोधन करा म्हणाले. चित्र्यांनी साहित्यविचार मांडला नव्हता. मला सैद्धांतिक विषय हवा होता. म्हणून मी 'भालचंद्र नेमाडे यांचा साहित्यविचार' असा विषय घेतला. डॉ. अक्षयकुमार काळे माझे मार्गदर्शक होते. नेमाडे लौकिकतावादी लेखक. दभि अलौकिकतावादी. १९९९ साली हा विषय मला का दिला ते मला २४ जाने. २०१६ ला सर जाण्याच्या तीन दिवस आधी तेही दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये कळले. पण तेव्हा सर बोलण्याच्या स्थितीत नव्हते.

अक्षयकुमार काळे सर आणि दभि यांच्यात त्यावेळी तात्त्विक मतभेद

होते; पण विषय किंवा संशोधन या दोन्ही बाबतीत मला काहीच अडचण आली नाही. उलट नेमाडे यांनीही संशोधनाचे कौतुक केले. दभि आणि यशवंत मनोहर यांच्यातही तेव्हा असेच मतभेद होते; पण मी दोघांचाही लाडका विद्यार्थी होतो. माझी एम. फिल. ची मुलाखतही मनोहर सरांनीच घेतली. आपले मतभेद वाङ्मयात; विद्यार्थ्यांच्या करिअरमधे आणायचे नाहीत ही खोल समज या सर्व शिक्षकांत होती. कारण, पटत नसले तरी त्या तिघांनाही परस्परांचे वाङ्मयीन योगदान आणि ताकद एकमेकांना माहीत होती. पुढे हे वातावरण निवळले. आता तर त्यातले काहीच उरले नाही. पण त्या काळात आमची कोंडी होत होती हे खरे.

दभि गुणग्राहक होते. माणसांची अचूक पारखही. मी रायटर झालो त्याच महिन्यात त्यांना लतादीदींच्या हस्ते वाग्विलासिनी पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या अभ्यासिकेत ते मोठे आणि जड स्मृतिचिन्ह ठेवलेले असे. मी ते रोज पुसत असे आणि हातात धरून पाहत असे. एकदा मी म्हणालो, 'सर हे किती सुंदर आहे नाही?' तर म्हणाले, 'हो ना. पण तसे एके दिवशी तुम्हालाही मिळेल.' मला खूप आश्चर्य वाटले तेव्हा. विश्वास बसला नाही. कारण तोपर्यंत मी कुणीच नव्हतो. पण पुढे माझ्या पाहिल्या समीक्षा ग्रंथाला वि. सा. संघाचा पहिला पुरस्कार मिळाला तेव्हा मात्र त्यांच्या शब्दांची आठवण झाली. तो घेऊन मी होस्टेलवर न जाता पहिले त्यांच्या घरी गेलो तर पहिला पेढाही त्यांनीच दिला.

– ६ –

माणसाचे आयुष्य असंख्य अतर्क्य गोष्टींनी भरलेले असते. त्याला आपल्या निर्णयाचीही जोड असते. प्रसंग, घटना या दरम्यान योग्य निर्णय घेऊनही अनेकदा अपेक्षित घडत नाही, तेव्हा माणसे नियती मानतात. माझा निर्णयावर विश्वास होता. माणूस दुःख-सुख भोगतो ते त्याच्या निर्णयामुळेच, असे माझे त्यावेळचे तत्त्वज्ञान होते. तत्त्वज्ञान उत्तर देत नसते, प्रश्न सोडविण्याचा आनंद देत असते. आपण मानतो तेच खरे असे वाटत असल्यानेच समाधान नावाची एक स्थिती तयार होत असते. ते सत्यही नसते आणि वस्तुनिष्ठही नसते. वस्तुनिष्ठतेच्या जवळ जाण्याची आणि अर्धसत्याच्या पातळीवर जगण्याची



आपली धडपड सुरू होते.

त्यावेळी मी खूप तर्कनिष्ठ आणि बुद्धिवादी होतो. पण जगणे त्याच्या खूप पलीकडचे असते. बुद्धी आणि तर्क, क्वचित तुच्छताही घेऊन मी जगण्याला समोर जात होतो. मोठ्यांच्या खांद्यावर बसून खूप लांबचे दिसते, दूरचे जवळ दिसते. पण ते तसे स्वानुभवाचे नसल्याने ते आभासीच असते. अर्थात हे ज्या वाक्यात आणि ज्या पद्धतीने आता कळते ती एक दोन वाक्ये- निष्कर्षही, त्यांच्यापर्यंत जाण्यासाठी खूप किमत मोजावी लागते. दभिंच्या सहवासाचे हे साईड इफेक्ट होते. त्यांचे शत्रू, पूर्वग्रह, मते, भूमिकाही आपल्या होतात. जी जाणीव तयार होते तीही; आपली नेमकी कोणती, हेही कळत नाही. तत्त्व की पूर्वग्रह भूमिका की अगतिकता, हे बंधन आहे, की स्वातंत्र्य? कसे ठरवायचे, हे तेव्हाचे खूप तीव्र प्रश्न होते.

– ७ –

सरांचे वाचन प्रचंड आणि विविधांगी होते. पहाटे चारला ते उठत. मी, दीपक कधी त्यावेळी येऊन डिक्टेशन घेत असे. आम्ही नसलो तर स्वतः सर लिहीत. ते कायम पहाटे चारला उठत. मला आठवते, अमरावतीच्या जनसाहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मी त्यांच्या बरोबर हॉटेलमध्ये होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता त्यांचे व्याख्यान होते. रात्री उशिरापर्यंत आयोजक डॉ. सुदाम सावरकरांशी आम्ही बोलत होतो. झोपायला दोन वाजले असतील. त्यामुळे मी सकाळी उशिरा म्हणजे सात वाजता उठलो, तर दभि आंघोळ वगैरे आटोपून भाषणाचे टिपण लिहीत बसले होते. मग मीच ओशाळलो. ही पहाटे वाचन- लेखनाची सवय त्यांची अजून कायम आहे.

सरांनी ज्ञान दिलं. धीर दिला. निष्ठा शिकवल्या. चांगुलपणा, नैतिकता शिकवली. त्यामुळे विद्यार्थी त्यांचे झाले. पण एक झालं..त्या सगळ्यांना खूप जास्त इन्कमटॅक्स भरावा लागला. व्यावहारिक जगात या मूल्यांना फार किमत नव्हती. म्हणून मुनघाटे स्कॉलर असून अकरा वर्षांनी, हेमंत खडके आठ वर्षांनी, कापगते बारा, मी सात वर्षांनी नोकरीला लागलो. डॉ. शुभांगी पातुरकर अजून नोकरीवर नाहीत. दीपक अजूनही वृत्तपत्रातच आहे. मात्र त्यांचा एकेक विद्यार्थी बावन्नकशी आहे हे सांगायला नकोच.

मला ती संध्याकाळ आठवते. महालच्या टिळक चौकात सायंकाळी चारच्या सुमारास प्रमोद मुनघाटे सरांची अचानक भेट झाली. मी असाईनमेंट आटोपून येत होतो. ते म्हणाले नाश्ता करू. सरांनी मला बटाटेवडे खाऊ घातले. मी त्यांना एक प्रश्न केला, 'सर तुम्ही एम. ए. प्रथम श्रेणी, नेट, पीएच. डी. शिवाय घरच्या अकरा शाळा- कॉलेज. तरी तुम्ही अकरा वर्षांनी नोकरीस लागला. इतके वर्ष हा धीर तुम्ही कसा आणि कोणत्या प्रेरणेने राखला?'. सर चमकले. त्यांना माझ्यात अकरा वर्षापूर्वीचा प्रमोद दिसला असेल. ते म्हणाले, 'देवानंद, आपल्याला वाचनाची आवड असते. त्यातून आपण वेडे होतो. व्यवहारापासून दूर जातो आणि आपण जे ग्रंथ वाचतो ना ते लेखक ग्रंथातून भेटतात. ते खूप बुद्धिवादी आधुनिक वाटतात. पण ते प्रत्यक्षात तसे असतातच असे नाही. त्यावरून आपण व्यावहारिक जीवनात काही ठरवू नये एवढे नक्की'. ते खूप शांतपणे आणि समजूतदारपणे बोलत होते. मनापासून. त्यात माझे सांत्वन करणे, स्वतःचे इम्प्रेशन मारणे काही नव्हते. अर्जुनाला श्रीकृष्णाने सांगावे तसे ते सांगत होते.

पण हाय! २० जानेवारीलाच त्यांना दवाखान्यात ॲडमिट केल्याचे बडोद्याच्या हेमा लेले यांच्याकडून २२ ला रात्री कळले. मी तडक पुण्याला गेलो. पेशंटला भेटू देत नसत. व्हिजीट पास काढून भेटायला जायचे. 'दीनानाथ'मध्ये सर शांतपणे झोपले होते. याच दीनानाथ स्मृती प्रतिष्ठानचा वाग्विलासिनी पुरस्कार त्यांना लताबाईंच्या हस्ते मिळाला होता आणि आता बोलायचे नाही, उठवायचे नाही असा सल्ला होता. मला खूप वाईट वाटले. सकाळी जाखडे सरांकडून मी 'पद्मगंधा' दिवाळी अंक घेतला व ते व मी दोघेही पुन्हा हॉस्पिटलला गेलो. बाहेर थांबलो. एकटाच होतो, अंकातील सरांचा लेख मी तिथेच वाचला. मी वाक्ये अधोरेखित करत होतो, तेव्हा शेजारचा तरुण म्हणाला, 'कोण आहे, तुमचे ॲडमिट?'. मी सांगितले तेव्हा तो म्हणाला, 'अहो इथे पेशंटचे नाव दत्तात्रेय कुलकर्णी असे पुकारतात. तेच दभि कुलकर्णी आहेत हे माहीतच नाही'. त्याला काय बऱ्याच जणांना ते माहीत नव्हते हे बरेच होते. नाहीतर मिडिया, लोक यांच्या गर्दीचा हॉस्पिटलच्या व्यवस्थेला व इतर पेशंटला त्रासच झाला असता. मी दोनदा त्यांना पाहिले. व्हेंटिलेटरवर ठेवलेले व शांत झोपलेले सर. गेल्या बावीस वर्षांत मी त्यांना कधी झोपलेले पहिलेच नव्हते. कसे पाहणार? ते पहाटेच उठत व वाचत लिहीत. दुपारीही थोडीच विश्रांती घेत. रात्री अकरा वाजता फोन केला तरी जागेच. एक ज्ञानमग्न माणूस असा पहुडलेला मी पहिल्यांदाच पाहत होतो. त्यांना मी आल्याचे व विशेष नेमाडे वरचा लेख मी वाचल्याचे, त्यातील मुद्दे मला आवडल्याचे सांगायचे होते. पण त्यांनी मला नुसते पाहिले. त्यांना आतून पिळवटून आले असावे, कारण तसे चेहऱ्यावर भाव उमटू लागले, आता जास्त वेळ थांबलो तर बांध फुटेल की काय, असे वाटून तडक बाहेर पडायचे ठरवले. मला फार गलबलून आले. दुपारी डॉ. उषा कोटबागी व श्री. कोटबागी आलेत. ते म्हणाले, 'सर बेशुद्ध नाहीत. मी काल त्यांना दभि म्हणून हाक मारली, त्यांनी डोळे उघडले व ओळखले. अधून मधून पेशंटला असे जागे करा. कुणी आपले वाट पाहत आहे, ही जाणीव महत्त्वाची असते तुम्ही जा. बोला. 'पेशंट जवळ जाणे इतके शक्य नसते. एक तर पास लागतो, तसेच आतून बोलावले असेल, काही खायला मागितले असेल तर ते देण्यासाठीच आत जाता येते.' असा हॉस्पिटलचा नियम होता. मग अभिनदादाचा पास मी गळ्यात अडकवला. अंक हातात घेतला आणि गेटवर सांगून आत गेलो. सोबत नात नेहाही आली. मी 'सर' अशी हाक मारली आणि त्यांनी डोळे उघडले. ओळखले. त्यांचा चेहरा कसनुसा झाला. त्यात वेदना केविलवाणेपणा नव्हता. बोलण्याची धडपड होती. मी अंक समोर धरला. लेख अप्रतिम आहे. असे सांगितले. ते पुन्हा बोलण्यासाठी धडपडू लागले. काय सांगायचे असेल? इतक्या वर्षातील हीच अशी एक भेट होती की ज्यावेळी आम्ही साहित्यावर बोललो नाही. चर्चा केली नाही. मात्र त्या मौन संवादात सारे काही आले. जो लेख वाचून खुद्द नेमाडे यांचे त्यांना पत्र आले होते, त्यात सरांच्या समीक्षेची सर्व ताकद उतरली होती. त्याच रात्री मला पंढरपूरला परतावे लागले, कारण दुसऱ्या दिवशी प्रजासत्ताकदिन होता.

२७ ला सोलापूर विद्यापीठात एक मिटींगला जात असतानाच नेहाकडून कळले- सर गेले. त्याच दिवशी अंत्यसंस्कार होते. ते पुण्याच्या वैकुंठ भूमीत झाले. मसाप पुणे आणि इतर दभिंच्या चाहत्यांना त्यांचे पार्थिव परिषदेच्या कक्षात ठेवायचे होते, सर्वांना अंत्यदर्शन देण्यासाठी. पण अभिनदादांनी त्यांना थेट वैकुंठभूमीत नेण्याचे ठरवले होते. जाखडे त्यांना समजावून सांगून थकले होते. मी निघताना त्यांना फोन केला. ते म्हणाले, 'कशाला येता, तुम्ही पोचेपर्यंत

सर्व आटोपलेले असेल. मला भेटायला यायचे असेल तर या. त्या दिवशी मी पोहचू शकत नव्हतो. मात्र दुसऱ्या दिवशी (२८ जाने.) आळंदीला ८ वा. अस्थिविसर्जन होते. मी रात्रीची गाडी पकडून पहाटे स्वारगेटला पोचलो. कोल्हापुरातून कृष्णा गुरव हे सरांचे पहिले लेखनिक, त्यांचे मित्र, नागपुरातून श्याम धोंड, राजा नाईकवाडे आले होते. सारे एकत्रच आळंदीला आलो. सर पंढरपूरला कधीच आले नव्हते. सगुण भक्तीपेक्षा त्यांना निर्गुण-ज्ञानभक्तीच महत्त्वाची वाटत होती. आपल्या आवडत्या लेखकाची स्वाक्षरी जपून ठेवण्याचा व त्याच्यासोबत सेल्फी काढण्याचा हा जमाना. दभि मात्र आपल्या आवडत्या जीएंना कधी भेटले नाही. मर्ढेकरांनाही नाही. त्यांना पत्र फोन कधी संपर्क नाही. लेखक त्याच्या चरित्रातून नव्हे तर त्याच्या साहित्यातूनच समजतो या त्यांची साहित्यशास्त्रीय भूमिकेशी हे सुसंगतच होते. मात्र ज्ञानेश्वरांच्या भेटीचा प्रश्नच नव्हता. ज्ञानेश्वरीच्या या अभ्यासकाच्या अस्थी आता इंद्रायणीत विसर्जित होत होत्या. अशी नाही तर तशी भेट. आमची भेट मात्र आता पुन्हा कधीच होणार नव्हती. हे कळले होते, पचवणे अवघड होते. अभिनदादा, नेहा, यांच्या सोबत साहित्य परिषदेतर्फे महाजन तिथे आले होते. आम्ही अस्थी व फुले इंद्रायणीत विसर्जित केली. आम्ही दहाजणांनी पसायदान म्हटले. आणि परतलो. आळंदीला समाधीच्या प्रवेशदारात नामदेवाच्या अभंगाच्या ओळी लिहिल्या आहेत, त्या आठवत आम्ही इंद्रायणी, आळंदी आणि दभिंचा निरोप घेतला.

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारा वाटा मुरडताती
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळा पांगलेसे
हरिणीविण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडसें भ्रमताती
मायबापें आम्हा त्यागियेलें जेव्हां । ऐसें संकट तेव्हां जालें नाही

**डॉ. देवानंद सोनटक्के**
मराठी विभाग,
रयत शिक्षण संस्थेचे डी.पी. भोसले कॉलेज
कोरेगाव, जि. सातारा
भ्रमणध्वनी- ९८६०२६३१६३